# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

## मंगळवार, दिनांक १३ मार्च, २०१८ / फाल्गुन २२, १९३९ (शके)

२९. महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०२ (३) अन्वये मंगळवार, दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी, सकाळी ११.३० वाजता **अवर सचिव, श्री. उमेश शिंदे यांचे दालन कक्ष क्रमांक १५०१, पंधरावा मजला, विधान भवन, मुंबई येथे** संगणकीय आज्ञावलीव्दारे अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम काढण्यात आला आहे. निदेशानुसार सदरहू ठराव शुक्रवार, दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी खालीलप्रमाणे चर्चेला घेण्यात येणार आहेत:-

**(शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला अशासकीय ठराव) —**

**(१) श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८६ — (मंत्र्यांचे उत्तर)-**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकांसारख्या आर्थिक संस्थाकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तिला रोजगार मिळविण्याच्यादृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी व सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा भत्ता सुरू करावा, रोजगारासाठी भागभांडवलाची सोय करावी व बंदी घालण्यात आलेली नोकर भरती पुन्हा सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(मंगळवार दिनांक १३ मार्च, २०१८ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) -**

**(२) श्री. रामराव वडकुते वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ५७**

"शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(३) श्रीमती विद्या चव्हाण वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८१**

"केंद्र सरकारचे हवामान खाते आणि त्यांच्या वेधशाळा नैऋत्य मान्सुन पावसाचा अंदाज वर्तविण्याचे काम करते, मान्सुन पाऊस सुरु होण्याच्या अगोदर हवामान खाते आधी तारखा जाहीर करते, तथापि, राज्यात मान्सुनचा पाऊस त्या तारखांना सुरु होत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येते, मुंबईतील हवामान खात्याने पाऊस पडण्याची दिलेली तारीख आणि पुणे वेधशाळेने दिलेल्या तारखेत फरक असणे, पाऊस आणि इतर हवामानाचा विकसीत देशात देण्यात येणाऱ्या अचुक अंदाजामागे आधुनिक तंत्रज्ञान हे कारण असते, हवामानाचा अचुक अंदाज शेतकऱ्यांना देण्यासाठी राज्य शासनाने आधुनिक तंत्रज्ञान वापरुन परिपूर्ण विस्तारित व्यवस्था निर्माण करण्याची शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(४) श्री. जयवंतराव जाधव वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ११**

"महाराष्ट्र राज्यातील न्यायालयीन कामकाज इंग्रजी भाषेत केले जात असणे, मात्र राज्यातील न्यायालयांमधील कामकाज मराठी या मातृभाषेतून करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा मराठी करण्याची आवश्यकता असल्याने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४८ नुसार आवश्यक कार्यवाही करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(५) श्री. आनंदराव पाटील वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १०८**

"केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे, त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(६) श्री. जगन्नाथ शिंदे वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७५**

"राज्यात वेळावेळी पडणाऱ्या दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता, पावसाळा संपत असतानाच पुढील वर्षभरासाठी राज्यातील पाणीसाठा जतन करण्याची आवश्यकता, राज्यातील जनतेला लागणारे पिण्याचे पाणी, शेतीसाठी लागणारे पाणी, औद्योगिक वसाहती व कारखान्यांना आणि अन्य घटकांना लागणाऱ्या पाण्याचे न्याय वाटप होऊन प्रत्येकाला पुरेसे पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सुरुवातीपासूनच विभागवार घेतली जाणारी पिके, त्या भागातील उपलब्ध पाणीसाठा व लोकसंख्या यांचा विचार करून प्रत्येक घटकाला वर्षभर पाणी कसे पुरेल याबाबत पूर्वनियोजन करून त्याची शासनस्तरावर काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १३ मार्च, २०१८.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

**<u>याची प्रत :</u>**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य.
२) मा.सभापती व मा. उप सभापती, विधानपरिषद यांचे सचिव तथा खाजगी सचिव
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
५) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
७) संगणक कक्ष (website)
८) एम.के.सी.एल.कक्ष.